वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार- बुधवार दि. १५ जानेवारी २०२५ पाने ४ किंमत ३

## खंडणी (३०७), हत्या (३०२), मकोका लागला

# वाल्मिक कराडच्या हातात बेड्या नाहीत, असं का?





Email:- dailydivyawarta@Gmail.com

Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

बीड , (दिव्य न्युज):- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या होऊन महिन्याभरापेक्षा जास्त कालावधी झालाय. या प्रकरणात आरोपींना अटक सुद्धा झालीय. पण न्याय मिळण्याबाबत अजूनही मनात संशय आहे. म्हणून सातत्याने तपासावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. या हत्या प्रकरणाच्या तपासासाठी विशेष तपास पथक एसबायब्ह ची स्थापना करण्यात आली. त्या ड्खढ मधील अधिकारी बदलण्यात आले. वाल्मिक कराडसोबतचे काही अधिकाऱ्यांचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले.

## देशमुखांच्या मारेकऱ्यांना लपविणाऱ्यांचाही हिशोब होईल; आरोपी संख्या पन्नासवर जाईल



बीड, (दिव्य न्युज):- मस्साजोगचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी पोलिसांचा तपास सुरू आहे. दरम्यान, अपहरण करताना स्विफ्ट गाडी कोणाची होती?, मारेकऱ्यांना राहायला कोणी घरं दिली?, या सगळ्या गोष्टी तपासात स्पष्ट होतील. खंडणीमधील जे आरोपी होते ते कोणाच्या घरात होते, त्यांना कोणी गाड्या पुरवल्या हे सगळं समोर येईल आणि त्यांचाही हिशोब होईल. इतकेच नाही तर संघटित गुन्हेगारीच्या या प्रकरणात आरोपींची संख्या पन्नासवर जाईल, अशी प्रतिक्रिया खा.बजरंग सोनवणे यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

खा.बजरंग सोनावणे यांच्यावर संतोष देशमुख यांच्या खुनाशी संबधित असलेला ▶▶ पान २ वर

## आरोपीसाठी शहर बंद ठेवायचं, आरडाओरडा करायचा हा नवीन परळी पॅटर्न

### राष्ट्रवादीच्या मुन्नीला बोलायला सांगा -आ.सुरेश धस



बीड , (दिव्य न्युज):- एखादा आरोपी जर गुन्ह्यात सापडला, त्याला पोलिसांनी ताब्यात घेतला तर त्याच्यासाठी शहर बंद ठेवायचं, आरडाओरडा करायचा हा आता नवीन परली पॅटर्न असल्याचा आरोप भाजपचे आमदार सुरेश धस यांनी केला. परळी बंद करणारे हा फक्त चार पाच टक्के लोकांचा गुंडवाद आहे असा आरोपही त्यांनी केला. आता फक्त आका सापडला आहे, त्याच्या पुढे अजून अनेकजण सापडतील असं धस म्हणाले. ▶▶ पान २ वर

## एसआयटीने कोर्टात सांगितले देशमुखांच्या हत्येचे कारण

केज, (दिव्य न्युज):- एसआयटीने आज वाल्मिक कराडला बीड जिल्हा कोर्टात हजर केले. एसआयटीने आजच्या सुनावणीत अनेकवेळा अवादा एनर्जी कंपनीचा उल्लेख केला. ९ डिसेंबरला संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या हत्येचं कारण आज कोर्टात समोर आलं आहे. एसआयटीने आज कोर्टात अनेक खुलासे केले. त्यात अवादा कंपनीकडे खंडणी मागितली जात होती. कंपनीने खंडणी दिली नाही, असा मोठा दावा एसआयटीने केला आहे. कंपनीकडून खंडणी मिळत नाही त्यासाठी संतोष देशमुख जबाबदार आहे. त्यांच्यामुळेच खंडणी मिळत नाही, ते अडथळा ठरत आहे, म्हणून त्यांची हत्या करण्यात आली असा दावा एसआयटीने केला. वाल्मिक कराड, सुदर्शन घुले आणि विष्णू चाटे यांनी अवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांना धमकावूनही त्यांनी खंडणी दिली नाही. संतोष देशमुख हे अवादा कंपनीच्या बाजूने उभे राहिले, त्यांनी सुदर्शन घुलेला आव्हान दिले. संतोष देशमुख खंडणीत अडथळा ठरल्यामुळे वाल्मिक कराड आणि इतर आरोपींनी देशमुखांची हत्या केल्याचा दावा विशेष तपास पथकाने (एसआयटी) केला आहे.

## धनंजय मुंडेंच्या गुंडाची टोळी संपली पाहिजे-जरांगे पाटील भडकले



बीड, (दिव्य न्युज):- खंडणीतल्या आरोपींना आम्हाला वाचवा म्हणून सरकारमधल्या मंत्र्याला मदत मागितली असणार आहे. या घटनेतील एकही आरोपी सुटता कामा नये. धनंजय मुंडेंची गुंडाची टोळी संपली पाहिजे. ही टोळी दहशत निर्माण करणारी आहे. देशमुख कुटुंबीयांना भेटण्याची धनंजय मुंडेंची मानसिकता नाही. हा क्रूर आहे. खून करणाऱ्यापेक्षा त्याचा कट रचून गुन्हा घडवून आणणारा सर्वात मोठा गुन्हेगार असतो. आरोपींना साथ देणारा सरकारमधीलच मंत्री आहे तोदेखील गुन्हेगार आहे असं सांगत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील धनंजय मुंडेंवर भडकले आहेत.

बीड कोर्टाने वाल्मीक कराडला ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावल्यानंतर जरांगेंनी ▶▶ पान २ वर

## हत्येच्या दिवशी आरोपींसोबत १० मिनिटे बोलला अन् वाल्मिक अडकला

बीड , (दिव्य न्युज):-वाल्मिक कराड याच्यावर मकोका आणि हत्येच्या कटात सहभागी असल्याचा ठपका ठेवल्यानंतर त्याला बीड कोर्टात हजर करण्यात आले. एसआयटीचे प्रमुख तपास अधिकारी अनिल गुजर यांनी वाल्मिकचा खून प्रकरणात सहभाग आहे याचा पुरावाच न्यायालयाला दिला. ज्या दिवशी संतोष देशमुख यांची हत्या झाली, त्या ▶▶ पान २ वर

## एसआयटीच्या अधिकाऱ्यांनी 'या' ९ मुद्यातून सांगितलं कारण

बीड , (दिव्य न्युज):- वाल्मिक कराडवर मंगळवारी मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यामुळे त्याचा पाय आणखी खोलात गेला होता. मात्र कराडवर नेमका मकोका का लावण्यात आला होता? याचं कारण आता एसआयटीने कोर्टात सांगितलं आहे.संतोष देशमुख हे संघटित गुन्हेगारीचा प्रकरण असल्याने वाल्मिक कराडवर मकोका लावला अशी माहिती तपास अधिकाऱ्यांनी कोर्टात दिली.तसेच कराडच्या गुन्हेगारीची यादी कोर्टात सादर करण्यात आली आहे, अशी माहिती एसआयटीने दिली आहे.

वाल्मिक कराडला आज बीडच्या कोर्टात सुनावणीसाठी हजर करण्यात आले होते. यावेळी एसआयटीने कराडची कस्टडी मिळवण्यासाठी कोर्टात जोरदार युक्तीवाद केला होता. यावेळी एसआयटीने कोर्टासमोर ९ बाबी मांडल्या होत्या. संतोष देशमुख यांच्या हत्येच्या दिवशी वाल्मिक कराड, सुदर्शन ▶▶ पान २ वर

## पोलीस व्हॅनमध्ये बसताना वाल्मीक कराडने आवाज दिलेला रोहित कोण?

केज, (दिव्य न्युज):- पवन चक्की कंपनीला खंडणी मागितल्या प्रकरणातील संशयीत आरोपी वाल्मीक कराड याच्याविरोधात काल मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. काल कराड याला न्यायालयात दाखल करण्यात आले होते, यानंतर न्यायालयातून रुग्णालयात तपासणीसाठी हजर करण्यात आले. यानंतर रुग्णालयातून बाहेर पडत असताना वाल्मीक कराड याने रोहित कुठे आहे? , असा प्रश्न केला. याबाबतचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. अनेकांनी हा रोहित आहे तरी कोण असे प्रश्न उपस्थित केले, यावर आता भाजपा आमदार सुरेश धस यांनी उत्तर दिले आहे.

काल न्यायालयात हजर करण्यात आल्यानंतर कराड याला रुग्णालयात तपासणीसाठी आणण्यात आले. यावेळी रुग्णालया बाहेर वाल्मीक कराड याच्या समर्थकांनी गर्दी केली होती, यावेळी पोलिसांची संरक्षण ▶▶ पान २ वर

## वाल्मीक कराडला ७ दिवसांची एसआयटी कोठडी

### जिल्हा न्यायालय परिसरात समर्थक, विरोधकांची घोषणाबाजी

बीड, (दिव्य न्युज):- खंडणी प्रकरणातील आरोपी आणि धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मीक कराडच्या रिमांडवर आता केज न्यायालयाऐवजी बीड जिल्हा न्यायालयातील विशेष मकोका कोर्टात सुनावणी पार पडली. सुनावणी दरम्यान तपास अधिकाऱ्यांकडून नवनवीन दावे आणि माहिती कोर्टासमोर सादर करण्यात आली. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर कोर्टाने वाल्मीक कराडला ७ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, एसआयटीने १० दिवसांच्या पोलिस कोठडीची मागणी केली होती.

वाल्मीक कराडला विशेष मकोका न्यायालयाने ७ दिवसांची एसआयटी कोठडी सुनावली आहे. मकोका कायद्यांतर्गत ही कोठडी देण्यात आली आहे. या ७ दिवसांत वाल्मीक कराड याचा संतोष देशमुख हत्या प्रकरणात सहभाग होता का? ▶▶ पान २ वर

## वाल्मिक कराडला फर्ग्युसन जवळ ऑफिस खरेदीसाठी मदत करणारी 'ती' महिला कोण?

पुणे , (दिव्य न्युज):- सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड याच्याकडे गडगंज संपत्ती असल्याचे आरोप करण्यात आले आहेत. याबाबत भाजप आमदार सुरेश धस यांनीच अनेकदा आवाज उठवला आहे. तर आता शरद पवार यांच्या राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील यावरून सरकारला घेरताना कराडची चौकशी ईडी का करत नाही? असा सवाल केला आहे. तर कराड याची पुण्यात संपत्ती असल्याचे दावे केले जात आहेत.दरम्यान पुण्यातील उच्चभ्रू सोसायटीत ▶▶ पान २ वर

## परळीत थर्मल परिसरातील जागेतच राखेचे साठे; अवैध वाहतूक सुरूच, प्रशासन करतंय काय?

फोटो परळी

परळी, (दिव्य न्युज):- दाऊतपूर राख बंधाऱ्यातून गेल्या दहा दिवसांपासून राखेचा होत असलेला अनधिकृत उपसा जरी बंद असला, तरी थर्मलजवळील वापरात नसलेल्या जागेत अनेक वर्षांपासून राखेचे ढिगारे तयार करण्यात आले आहेत. सध्या दाऊतपूर व दादाहारी वडगाव शिवारातील साठेबाजी केलेल्या ढिगाऱ्यातून राख हायवामध्ये टाकून राखेची वाहतूक करून विक्री गेल्या दोन दिवसांपर्यंत चालू होती. त्यामुळे बेकायदेशीर राखेची वाहतूक चोरी चोरी, छुपके... छुपके चालूच आहे. शनिवारी रात्री परळी-मिरवट मार्गावर राख टिप्परच्या धडकेने सौंदना गावच्या सरपंचांचा मृत्यू झाल्यानंतर परळीत राखेची अवैध वाहतूक सुरू असल्याचे अधोरेखित झाले.

दाऊतपूर व दादाहारी वडगाव शिवारात राखेचे साठे कोणी केले,



## दंडाची नोटीस मिळताच टिप्पर मालकांची हायकोर्टात धाव

### स्टे मिळण्याची शक्यता

बीड, (दिव्य न्युज):- जिल्हा प्रशासनाने वाळुची वाहतुक करणाऱ्या टिप्पर मालकांना दंडाच्या नोटीस बजावल्या आहेत. एका एकाला दीड ते दोन कोटी रुपयांपासून साडेपाच कोटी रुपयापर्यंतच्या दंडाची नोटीस देण्यात आली आहे. मात्र जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केलेल्या या कारवाईला आव्हान देत ८ टिप्पर मालकांनी हायकोर्टात याचिका दाखल केली.सोमवारी ही याचिका दाखल झाल्यानंतर न्यायालयाने या प्रकरणात मंगळवार दि. १४ जानेवारी रोजी सुनावणी ठेवली आहे. जिल्हाधिकाऱ्यांना आजपर्यंत म्हणने सादर करण्याचे निर्देश कोर्टाने दिले आहेत. कोणत्या आधारावर टिप्पर मालकांना दंडाची नोटीस बजावण्यात आली आहे अशी विचारणा देखील करण्यात आली आहे.

## महाराष्ट्रात २१ नवीन जिल्ह्यांच्या निर्मितीची योजना, २६ जानेवारीला घोषणा होण्याची शक्यता

मुंबई, (दिव्य न्युज):- महाराष्ट्रात लवकरच प्रशासकीय पुनर्रचना होण्याची शक्यता आहे. राज्य सरकार महाराष्ट्रात तब्बल २१ नवीन जिल्ह्यांच्या निर्मितीचा विचार करत आहे. प्रशासकीय सोय आणि स्थानिक विकासाला गती देणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या ३५ जिल्ह्यांपैकी काही जिल्ह्यांचे विभाजन करून हे नवीन जिल्हे अस्तित्वात येतील. येत्या प्रजासत्ताक दिनी, म्हणजेच २६ जानेवारी २०२५ रोजी या संदर्भातील अधिकृत घोषणा होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. त्यावेळी राज्यात केवळ २६ जिल्हे होते. मात्र, वाढती लोकसंख्या आणि प्रशासकीय गरजा लक्षात घेता टप्प्याटप्प्याने नवीन जिल्ह्यांची भर पडत गेली. २०१४ मध्ये ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर हा नवीन जिल्हा निर्माण करण्यात आला. २०१८ मध्ये, राज्य सरकारने गठीत केलेल्या एका समितीने २२ नवीन जिल्ह्यांचा प्रस्ताव सादर केला होता. आताच्या प्रस्तावात यापैकी अनेक जिल्ह्यांचा समावेश

## कॉलेजमध्ये कॉलर उडवण्यावरून वाद

## फ्लॅटमध्ये घुसून तरुणाचा चिरला गळा

औरंगाबाद , (दिव्य न्युज):-शहरात शिक्षणासाठी आलेल्या १९ वर्षीय प्रदीप विश्वनाथ निपटे या विद्यार्थ्याची अज्ञातांनी निर्घृण हत्या केली. मित्र बाहेर गेलेले असताना मारेकऱ्यांनी त्याच्या फ्लॅटवर जात त्याला गळा चिरून मारून टाकले. मंगळवारी रात्री ११.३० वाजता उस्मानपुऱ्यात ही धक्कादायक घटना उघडकीस आली.



मूळ माजलगावचा असलेला प्रदीप देवगिरी महाविद्यालयात बीसीएसच्या प्रथम वर्षात शिकत होता. एक मावसभाऊ व अन्य तीन मित्र, असे सोबत भाजीवालीबाई पुतळ्याजवळील एका अपार्टमेंटमध्ये फ्लॅटमध्ये किरायाने राहत होते. मंगळवारी महाविद्यालयातून सर्व जण परतले. सायंकाळी त्याचा भाऊ व अन्य मित्र बाहेर गेले होते. प्रदीप मात्र एकटाच फ्लॅटवर थांबला होता. रात्री १० वाजता ते खोलीवर परतले. तेव्हा प्रदीप गळा कापलेल्या रक्तबंबाळ मृतावस्थेतच दिसला. घटनेची माहिती मिळताच उस्मानपुऱ्याचे पोलिस निरीक्षक अतुल येरमे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली.प्रदीप फ्लॅटवर एकटा आहे, याची पुरेशी माहिती घेऊन मारेकरी तेथे गेले असावेत. धारदार शस्त्राने गळ्यावर दोन वार करून जीव घेतला. त्यानंतर त्याला अंथरुणावर झोपलेल्या अवस्थेत ठेवून त्याच्या अंगावर पांघरूण टाकले. मित्र परत आल्यानंतर त्यांचे काही वेळ तिकडे लक्ष गेले नाही; पण अर्धातास उलटूनही प्रदीप उठत नसल्याने एकाने पांघरूण काढले आणि सगळयांच्या पायाखालची जमीनच सरकली.

प्रदीपच्या हत्येला महाविद्यालयात झालेल्या वादाची पार्श्वभूमी असल्याचा प्राथमिक संशय आहे. शनिवारी महाविद्यालयातील मुलांची व प्रदीपच्या मित्रांची 'एकटक का पाहतो, तू कॉलर का उडवतो', अशा किरकोळ कारणांवरून वाद होऊन हाणामारी झाली होती. मध्यरात्रीतून पोलिसांनी महाविद्यालयातील काही तरुणांची माहिती घेऊन चौकशी सुरू केली होती.

# अंबाजोगाईच्या मुख्य रस्त्यावरील अतिक्रमणावर हातोडा

## ४०-५० वर्षापूर्वीची अनेक पक्की बांधकामे जमीनदोस्त, मुख्य रस्ता शंभर फुटांचा होणार

अंबाजोगाई, (दिव्य न्युज):- शहरातील चार पदरी रस्त्याचे काम पुर्णत्वाकडे येत असताना छत्रपती शिवाजी महाराज चौक ते स्वाराती रूग्णालय या रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी मोहिम राबविण्यासाठी बांधकाम विभागाकडून अतिक्रमण धारकांना नोटीसा पाठविल्या. त्यांची मुदत आज संपल्यामुळे तगड्या पोलिस बंदोबस्तात आज सकाळी १० वाजता अतिक्रमण धारकांच्या घरावर बुलडोझर फिरले. यात बड्या लोकांच्या इमारतीबाबत भेदभाव केल्याचा आरोप स्थानिक राहिवाशांनी केला आहे.

शहरातील रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी आ.नमिता मुंदडा यांनी कोट्यावधी रूपयांचा निधी आणला. शहरातील वाढती लोकसंख्या व वाहनांची संख्या लक्षात घेता रस्ते अपुरे पडू लागले होते. तसेच वाहनांची कोंडी हे नित्याचेच बनले होते. लहानमोठे अपघात झाले नाही असा एक दिवसही जात नव्हता. याची गंभीर दखल घेवून मुंदडा यांनी शासन दरबारी पाठपुरावा करून चौपदरीकरणासाठी निधी आणला. या रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने संबंधित अतिक्रमण धारकांना नोटीसा पाठवून आपआपले अतिक्रमण काढून घ्यावे असे फर्मान सोडले होते. परंतु काही नागरीकांनी या नोटीसीला बेदखल केले. आज सोमवारी सकाळी १० वाजता शहर पोलिस ठाण्यापासुन सुरू झालेली अतिक्रमण मोहिम स्वामी रामानंद तीर्थ रूग्णालयापर्यंत फत्ते केली. परंतु सदर बाजार चौकापासून सुरू झालेले अतिक्रमण मोहिमेमुळे अनेकांची घरे पाडून बेघर केली.



गरीबांची घरे पाडली, परंतु काही ठिकाणी ५० फुटाचे अंतर मोजताना भेदभाव केल्याचा स्थानिकांनी यावेळी प्रशानाकडे केला. अतिक्रमण काढणे हे स्वागतार्ह असले तरी नियम सर्वांना सारखा असायला पाहिजे होता. तो या मोहिमेतून दिसून आला नाही. असा आरोप स्थानिक रहिवाश्यांनी केला आहे.

शहरात तगडा पोलिस बंदोबस्त

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते स्वाराती रूग्णालय रस्त्यालगत असलेल्या अतिक्रमण धारकांची घरे काढण्यासाठी बांधकाम विभागाने तगडा पोलिस बंदोबस्त लावला होता. या बंदोबस्तातच सर्व अतिक्रमणे काढण्यात आली. किरकोळ प्रकार वगळता पोलिस बळाच्या बळावर ही मोहिम यशस्वी झाली. परंतु काहींच्या इमारतींना १०० फुटाचे अंतर मोजाना सुट दिल्याचे बोलल्या जात आहे.

मागील चार वर्षापुर्वी प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी अजित कुंभार न.प.कार्यालयात प्रशिक्षणार्थी म्हणून एक महिना घेत असताना त्यांनी शहरातील अतिक्रमणावर मोहिम राबविली होती. या मोहिमेत सर्व अतिक्रमणे दुरू करून रस्ते मोकळे केले होते. त्यानंतर आता प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे यांनी मुख्याधिकारी पदाचा पदभार घेतल्यानंतर शहरातील अतिक्रमाणाची मोहिम राबविली. ती यशस्वी ही करून दाखविली. परंतु सध्या असलेल्या मुख्याधिकार्यांना अशा मोहिम का राबवाव्या वाटत नाहीत. असा प्रश्न सामान्य नागरिकांतून उपस्थित होवू लागला आहे.

प्रशिक्षणाअर्थी जिल्हाधिकारी तथा मुख्याधिकारी अर्पिता ठुबे, पोलिस उपअधिक्षक अनिल चोरमले, शहर पोलिस ठाण्याचे शहर निरिक्षक विनोद घोळवे, दंगल नियंत्रक पथकाचे अधिकारी नगर पालिकेतील स्वच्छता निरिक्षक अनंत वेडे, सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता गौरी शंकर स्वामी, सहाय्यक अभियंता मुंडे, कनिष्ठ अभियंता गोविंद शेळके यांच्यासह प्रशासनातील अधिकारी व कर्मचार्यांचा मोठा सहभाग होता.

# महायुतीचे नेते अन् कार्यकर्ते करणार गावागावात 'डब्बा पार्टी'

मुंबई, (दिव्य न्युज):- विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड यश मिळाले. महायुतीला २३० जागांवर यश मिळाले. त्यात भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला. भाजपला १३२, शिवसेनेला ५७ तर राष्ट्रवादी काँग्रेसला ४१ जागांवर विजय मिळाला. त्यानंतर मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांचा शपथविधी झाला. त्या समारंभाला पंतप्रधान नरेंद्र मोदी आले होते. त्यानंतर दुसऱ्यांना नरेंद्र मोदी मुंबईत आले. यावेळी त्यांनी महायुतीच्या आमदारांची बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी भाजप, राष्ट्रवादी, शिवसेना आमदारांना अनेक टिप्स दिल्या. तसेच गावागावात महायुतीने डब्बा पार्टीचे आयोजन करावे, असा सल्ला दिला. मोदी यांच्या सल्लामुळे आता महायुतीकडून गावागावात डब्बा पार्टी होण्याची शक्यता आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आमदारांना महायुती म्हणून संघटन वाढवण्यावर भर द्या, असे आवाहन केले. महायुतीमधील एकोपा वाढण्यासाठी मोदी म्हणाले, मतदारसंघात घटक पक्षातील आपले जे आमदार आहेत पदाधिकारी आहेत, त्यांच्या कार्यालयांना एकमेकांनी भेटी द्या. तसेच महायुती अधिक घट्ट करण्यासाठीर गावो गावी डब्बा पार्टी आयोजन करा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसचे उदाहरण आमदारांच्या बैठकीत



दिले. अनेक वर्ष काँग्रेसने सत्ता कशी टिकवली याबाबत बोलताना पंतप्रधान म्हणाले, काँग्रेस एक पंचवार्षिक रस्ता करू, असे आश्वासन देते. दुसऱ्या पंचवार्षिकला नकाशा दाखवला जातो. तिसऱ्या पंचवार्षिकला कामाची सुरुवात करण्याची घोषणा करतात. आमदारांनी आपल्या मतदारसंघाची काळजी घेताना स्वतःच्या आरोग्याची देखील काळजी घ्यावी, अशा सूचना देण्यात आल्या. लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना आपल्याकडे सर्वाच लक्ष असते. त्यामुळे माध्यमांशी बोलताना काळजी घ्या. आपल्या हातून चुकीच्या बाबी घडणार नाहीत याकडे लक्ष द्या, असा सल्ला मोदी यांनी दिला.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून गुजरातमध्ये भाजपकडून सत्ता केंद्र कशा प्रकारे चालवले जात आहे, याचे उदाहरण देण्यात आले. गुजरातमध्ये ग्रामपंचायती, स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा, लोकसभा यामध्ये भाजपने एक हाती सत्ता कशी राखली आहे हे मोदी यांनी सांगितले. महाराष्ट्रात देखील महायुती अशाच प्रकारे काम करेल, अशी आशा व्यक्त केली.नवी मुंबईत इस्कॉन मंदिराच्या कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, मी सर्व संतांचा आभार मानतो. मंदिरात अधात्म आणि ज्ञानाचे पूर्ण दर्शन होत आहे. वृंदावनच्या धर्तीवर उद्यान बनवण्यात आलेले आहे. भारताच्या चेतनेला जागृत करणारे पुण्य केंद्र हे मंदिर बनणार आहे. या ठिकाणाचा आधात्मिक ठेवा महत्वाचा आहे.

पान १ वरून

## वाल्मिक कराडच्या

त्यामुळे तपासाच्या हेतूवर प्रश्नचिन्ह निर्माण होणं स्वाभाविक आहे. संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली. वाल्मिक कराड हाच या हत्येमागचा मुख्य मास्टर माइंड असल्याचा आरोप होतोय. पण त्याला वाचवण्याचा प्रयत्न होत असल्याचा विरोधी पक्षांचा आणि संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांचा आरोप आहे.

वाल्मिक कराड हा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे यांचा मित्र आहे. मुंडे यांचा निकटवर्तीय असल्यामुळे वाल्मिक कराडला वाचवण्याचा प्रयत्न होतोय. त्याला तुरुंगातही कैद्यासारखी वागणूक मिळत नसल्याचे आरोप होत आहेत. आता सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी द वर दोन पोस्ट केल्या आहेत. याद्वारे त्यांनी काही प्रश्न विचारले आहेत.

खंडणी(३०७), हत्या(३०२), संघटित गुन्हेगारी (मकोका) मध्ये गुन्हेगार असलेल्या, १४ दिवसांपासून आरोपी म्हणून तुरुंगात असणाऱ्या वाल्मिक कराडच्या हातात बेड्या का नाहीत ?पोलीस वाल्मिक कराडला आरोपी/गुन्हेगाराची वागणूक न देता एखादी वीआयपी सुरक्षा दिल्यासारखी का दिसत आहे ? गृहविभाग, पोलिस प्रशासन तसेच कायदेतज्ञांनी सांगावे कराडच्या हातात बेड्या का नाहीत.

सारखेच गुन्हे असलेले घुले, चाटे, सांगळे यांना बेड्या घालून वागणूक आहे पण वाल्मीक कराडला नाही. कराडच्या हातात बेड्या न घालण्याचे कारण काय ?

## देशमुखांच्या मारेकऱ्यांना

आरोपी वाल्मिक कराड यांच्या पत्नीने वाल्मिक कराड यांना लोकसभा निवडणूकीनंतर जिवे मारण्याची धमकी दिली होती, असा आरोप केल्यानंतर माध्यमांशी बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, उभ्या आयुष्यात मी कधीही कोणाला धमकी दिली नाही. उलट लोकसभा निवडणूकीची मतमोजणी सुरू असताना मलाच दमदाटी केल्याच्या खबरा माध्यमांवर पेरल्या गेल्या. त्यात काही लोकांनी स्वतची वाहवाही करून घेतली. मात्र, निकाल सुरू असताना असे काहीही झाले नव्हते. मी त्यावेळी धमकी दिली तर कराडताईंनी त्याच वेळेस का सांगितले नाही. आता सहा महिन्याने मनघडंत आरोप करण्याचे त्यांचे काम सुरू आहे. त्याबाबत फारसे न बोललेले बरे. दरम्यान, संतोष देशमुख यांचा क्रुरपणे खून करण्यात आला. ही घटना मानवतेला काळीमा फासणारी घटना आहे. या प्रकरणाची व्याप्ती मोठी आहे. संतोष देशमुख यांचे अपहरण करताना स्विफ्ट गाडी कोणाची होती? मारेकऱ्यांना राहायला कोणी घरं दिली?, या सगळ्या गोष्टी तपासात स्पष्ट होतील. खंडणीमधील जे आरोपी होते ते कोणाच्या घरात होते, त्यांना कोणी गाड्या पुरवल्या हे सगळं समोर येईल. परळी बाहेरचा विषय खूप मोठा आहे. केजमध्ये गुंडगिरी आणन्याचा प्रयत्न होत आहे. इतर आरोपींनासुद्धा मकोका लावला पाहिजे ही आमची मागणी आहे. हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टमध्ये अंडर ट्रायल चालवायला हवे. डव्होकेट उज्वल निकम जर होकार देत नसतील तर सतीश मानेशिंदे या वकील महोदयांची नियुक्ती विशेष सरकारी वकील म्हणून करण्यात यावी असेही खा.बजरंग सोनवणे यांनी म्हटले.

जमावबंदी असताना आंदोलन कसे?

बीडमध्ये दि.१४ रोजी रात्री वाजेपासून जमावबंदी आदेश लागू करण्यात आले होते. असे असतानाही परळीत आंदोलन कसे झाले? हिंदू सणाच्या दिवशी गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी परळी बंद करण्याचा निर्णय घेतला. या प्रकरणी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची भेट घेवून त्यांना सगळा वृत्तांत देणार आहे.

मुंडेच्या राजीनाम्याचा प्रश्न सरकारचा

गुन्हेगाराला कुठलीही जात नसते. काही मूठभर समाजकंटक आहेत, ज्यांना जातीय रंग द्यायचा आहे. अजित पवारांनी बीडमध्ये पक्षाची कारवाई करताना थोडा उशीर केला का काय असं वाटतंय. संतोष देशमुख हत्येच्या संदर्भात जे-जे आहेत, जे कोणी सामील असेल या सर्वांना फाशी झाली पाहिजे. मी मागितला तर धनंजय मुंडे राजीनामा देणार आहेत का? तो सरकारचा प्रश्न आहे ते बघतील, असेही खा.बजरंग सोनावणे यांनी म्हटले आहे.

## आरोपीसाठी शहर बंद

वाल्मिक कराडवर मकोका लावल्यानतंर त्याच्या विरोधात कराड समर्थक आक्रमक झाले आणि मंगळवारी त्यांनी परळी बंद ठेवली. त्यावर प्रतिक्रिया देताना आमदार सुरेश धस म्हणाले की, हा जातीयवाद नाही तर हा चार पाच टक्के लोकांचा गुंडवाद आहे. कोणत्याही गुन्हेगाराला ताब्यात घेतलं तर शहर बंद वायचं, दुकानं बंद ठेवायची हा नवीन परळी पॅटर्न आहे. पण यामुळे व्यापाऱ्यांचंच नुकसान होणार आहे.

आमदार सुरेश धस यांनी त्यांच्यावर होणाऱ्या आरोपांवरही उत्तर दिलं. आपल्यावर कुणीही काही बोलू नये. उगाच काहीतरी बोलून फोकस बदलायचा नाही. राष्ट्रवादीच्या मुख्य मुन्नीला बोलायला लावा असं धस म्हणाले. तसेच या प्रकरणात आता आकाला मकोका लागला आहे. त्यापुढे अजून बऱ्याच गोष्टी बाकी आहेत. आकाच्या वरची माणसेही त्यामध्ये सापडणार आहेत. तसेच या केसमध्ये उज्वल निकम यांची नियुक्तीही बाकी आहे असं सुरेश धस म्हणाले.

दरम्यान, संतोष देशमुखांच्या हत्येच्या दिवशी आरोपी सुदर्शन घुले, विष्णू चाटे आणि वाल्मिक कराडमध्ये फोनवरून संभाषण झाल्याची माहिती समोर आली आहे. ९ डिसेंबरच्या दिवशी दुपारी ३.२० ते ३.३० वाजण्याच्या दरम्यान या तिघांमध्ये नेमकं काय संभाषण झालं याचा तपास करायचा आहे असा युक्तिवाद एसआयटीकडून करण्यात आला. तसेच देशमुखांच्या हत्येच्या दिवशी वाल्मिक कराडने देशमुखांना धमकी दिली होती असा दावा एसआयटीने केला आहे.

वाल्मिक कराडला केज नगर पंचायतीनं पुन्हा एक दणका दिला आहे. वाईन शॉप सुरू करण्यासाठी दिलेलं ना हरकत प्रमाणपत्र केज नगरपंचायचीने रद्द केलं आहे. केजमधील वाईन शॉपला बेकायदेशीररित्या प्रमाणपत्र दिल्याचा आरोप स्थानिक खासदार बजरंग सोनावणेंनी केला होता. त्यानंतर नगर पंचायतीकडून प्रमाणपत्र रद्द करण्यात आल्याचं जाहीर करण्यात आलं.

## धनंजय मुंडेंच्या

माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी ते म्हणाले की, कोर्टाबाहेर पोलिसांनाही धमक्या दिल्या जात आहेत. मुख्यमंत्र्यांनी यांचा माज बघावा. बीड जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था अबाधित राहिली पाहिजे. धनंजय मुंडे पांगरीत त्यासाठीच आले. पाप झाकण्यासाठी गुंडाची टोळी रस्त्यावर उतरायला लागला आहे. ही टोळी रस्त्यावर उतरून जातीय दंगली घडवण्याचा प्रयत्न आहे. या टोळीमुळे एकाही गरीबाला त्रास होता कामा नये अन्यथा आम्हीही सहन करणार नाही असं त्यांनी सांगितले.

त्याशिवाय जातीय तेढ निर्माण करून दंगली निर्माण करण्याचा प्रयत्न धनंजय मुंडे यांचा आहे. धनंजय मुंडे हा टोळ्या चालवतोय. परळीत आंदोलन त्याच्या सांगण्यावरून होतंय. मराठ्यांना आवाहन आहे शांततेचे भूमिका घ्या. न्यायालय आणि पोलीस प्रशासनावर विश्वास ठेवायचा आहे. आता आरोपींचे समर्थन करायचे ते करू द्या. संतोष देशमुखांचे कुटुंब उद्ध्वस्त केले. धनंजय मुंडे जातीला पुढे करतो. पाप तुम्ही करायचे आणि ओबीसींना पुढे करायचे हे चालणार नाही असं मनोज जरांगे यांनी म्हटलं.

दरम्यान, पांगरी जाऊन आरोपींच्या घरच्यांना मंत्री भेटतो. यानेच आंदोलन करणाऱ्या टोळीला जातीय तेढ निर्माण करण्यास सांगितले. मुख्यमंत्र्यांनी थांबवावं. कोर्टासमोर धिंगाणा करणार असतील. पोलिसांनी दादागिरी करू नये आम्ही सहन करणार नाही ही भाषा वापरली जाते. संचारबंदी लागू केली ती कुठे गेली...सामाजिक सलोखा ठेवायचा नाही. जिल्ह्याची शांतता भंग करायची. खूनातील आरोपीला पाठीशी घालण्याचं काम धनंजय मुंडेंची टोळी करतेय. धनंजय मुंडे हा फडणवीस सरकारला लागलेला डाग आहे. धनंजय मुंडेंचाही खूनात हात आहे का अशी १०० टक्के आता शंका यायला लागली आहे असंही मनोज जरांगे पाटील यांनी आरोप केला.

## एसआयटीच्या अधिकाऱ्यांनी

घुले आणि विष्णु चाटे यांच्यात संभाषण झाले होते. तिघांमध्ये ३ वाजून २० मिनिटे ते ३ वाजून ३० मिनिटे असे १० मिनिटे संभाषण झाले. त्यामुळे १० मिनिटे काय संभाषण झालं याचा तापस करायचा आहे? असा महत्वाचा मुद्दा एसआयटीच्या अधिकाऱ्यांनी कोर्टासमोर मांडला. त्यातसोबत संतोष देशमुखांच्या अपहरणाची वेळ आणि संभाषणाची वेळ मिळती जुळती असल्याचाही मोठा मुद्दा यावेळी मांडण्यात आला.

संतोष देशमुखांचं अपहरण ३.१५ वाजता झालं होतं अशी माहिती एसआयटीने दिली होती. तर एफआयआरमध्ये संतोष देशमुख यांचा ३ वाजता अपहरण झाल्याचा उल्लेख आहे. यासोबत कराडने याआधी केलेल्या गुन्ह्यांची यादी कोर्टात सादर करण्यात आली आहे.

संतोष देशमुख हे संघटित गुन्हेगारीचा प्रकरण असल्याने कराडवर मकोका लावल्याचे एसआयटीच्या तपास अधिकाऱ्यांनी कोर्टात सांगितले आहे. तसेच तपासात जे पुरावे मिळाले आहे त्याची कॉस वेरिफिकेशन करायची आहे म्हणून कोठडी मिळावी, अशी मागणी एसआयटीच्या अधिकाऱ्यांनी कोर्टात केली आहे. या घटनेतील एक मुख्य आरोपी कृष्णा आंधळे फरार असून त्याला मदत केली का? हे देखील तपासायचे आहे. विदेशी मालमत्तेची देखील चौकशी करायची आहे? अशा सगळ्या गोष्टीचा तपास करण्यासाठी कोठडी मिळावी यांसाठी एसआयटीच्या अधिकाऱ्याकडून कोर्टात जोरदार युक्तिवाद करण्यात आला.

याचा तपास करायचा आहे. तसेच एसआयटी तपास अधिकाऱ्यांच्या नंतर आता सरकारी पक्षाच्या वकिलाचा युक्तिवाद सुरू झाले आहे. आणि सरकारी पक्षाच्या वकिलाकडून ही दहा दिवस पोलीस कोठडीची मागणी केली आहे.

## हत्येच्या दिवशी

दिवशी दुपारी खून प्रकरणातील आरोपी आणि वाल्मिक कराड यांचे बोलणे झाले असल्याचे कॉल रेकॉर्ड आम्हाला मिळाले आहेत. आरोपी आणि कराड यांच्यात १० मिनिटांचे बोलणे झाल्याचा दावा तपास अधिकारी गुजर यांनी न्यायालयात केला. त्यामुळे खून प्रकरणात वाल्मिक पुरता अडकल्याचे बोलले जाते.आतापर्यंत वाल्मिक कराडच्या खंडणी आणि देशमुख हत्या प्रकरणाची सुनावणी केज न्यायालयात होत होती. मात्र सुरक्षेच्या कारणास्तव बुधवारची सुनावणी बीड जिल्हा न्यायालयात झाली. तत्पूर्वी त्याला केज न्यायालयाच्या दिशेने रवाना केले होते. परंतु सुरक्षेचे कारण देऊन त्याला पुन्हा बीडला आणण्यात आले. दुपारी अडीच वाजताच्या दरम्यान बीड न्यायालयात सुनावणी सुरू झाली.

## पोलीस व्हॅनमध्ये

मोठ्या प्रमाणात होते. पोलीस व्हॅनमध्ये बसत असताना वाल्मीक कराड याने रोहित कुठे आहे?, असा प्रश्न केला. यावेळी पोलिसांनीही रोहित कुठे आहे, असं म्हणत बोलवायला सुरूवात केली. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

कराड याने बोलावलेला रोहित नेमका कोण आहे? याचे उत्तर भाजपा आमदार सुरेश धस यांनी दिले आहे. आमदार धस म्हणाले, रोहित हा त्याच्या हाताखाली काम करणारा कर्मचारी आहे. त्याच नाव रोहित कांबळे आहे. त्याची मदत लागत असेल. त्यालाही पोलिसांच्या गाडीत बसवून नेलं आहे, असंही आमदार धस म्हणाले.

वाल्मीक कराड याला मी भेटलेलो नाही. कराड याच्याबरोबर वाईट काय होते, त्याचे आणि माझे चांगले संबंध होते. पण, अशी माणस मारायला लागल्यावर त्याच्यासोबत मी रहायचे का?,असा सवालही आमदार धस यांनी केला. अजित पवार यांनी बीड जिल्ह्यातील राष्ट्रवादीची कार्यकारणी बरखास्त केली, यावर बोलताना आमदार धस म्हणाले, ते आता कारवाई करणार.ते राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. ते आता नवीन कार्यकारणी जाहीर करतील. विष्णू चाटे तालुका अध्यक्ष होते. त्यामुळे त्यांनी रद्द केली, असंही आमदार सुरेश धस म्हणाले.

## वाल्मीक कराडला

यासह विविध बाबींची चौकशी एसआयटी करणार आहे.

वाल्मीक कराडला जेलकडे नेत असताना बीड न्यायालयाबाहेर वाल्मीक कराडच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आले. वाल्मीक कराडला फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी वकील हेमा पिंपळे यांनी केली आहे. यावेळी वाल्मीक कराड समर्थक आणि विरोधकांची एकमेकांसमोर घोषणाबाजी केली. पोलिसांनी वाल्मीक कराड समर्थकांना ताब्यात घेतले आहे.

वाल्मीक कराडला केजहून बीडला आणत असताना चार अनोळखी वाहने पोलिसांच्या ताफ्यात शिरली होती. त्यामुळे आता सुनावणी पूर्ण झाल्यानंतर वाल्मीक कराडला जेलमध्ये नेण्यात येत असताना न्यायालय परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दरम्यान, पोलिस ताफ्यात घुसलेल्या अनोळखी वाहनांचा आणि वाहनचालकांचा पोलिसांकडून शोध सुरू आहे.बीड जिल्हा सत्र न्यायालयातील दोन्ही बाजूंचा व्यक्तीवाद पूर्ण झाला आहे. थोड्याच वेळात कोर्टाचा निकाल दिला जाईल. या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. तपास अधिकाऱ्यांनी केलेल्या दाव्यांवर न्यायाधीशांकडून देखील प्रश्नांची सरबत्ती करण्यात आली.

कोणत्याही आरोपींनी वाल्मीक कराडचे नाव घेतले नाही, अशी बाजू त्याच्या वकिलांनी कोर्टात मांडली होती. त्यावर हत्या आणि खंडणी प्रकरणात वाल्मीक कराडला फक्त फोन कॉलच्या आधारावर आरोपी बनवले का? वाल्मीक कराडचा सरपंच देशमुख यांच्या हत्येच्या गुन्ह्यात सहभाग असल्याची खात्री केली होती का? असे प्रश्न न्यायालयाने तपास अधिकाऱ्यांना केले आहे.

## वाल्मिक कराडला

वाल्मिक कराडची स्थावर मालमत्ता आढळून आली. यातील एक संपत्ती फर्ग्युसन रस्त्यावर आणि दुसरी वाकड येथे आहे.

सरपंच संतोष देशमुख यांची हत्या अपहरण करून करण्यात आली होती. तर आर्थिक घडामोडीतून झाल्याचे समोर आले आहे. त्यांनी खंडणी मागणाऱ्या कराड यांच्या साथिदारांना विरोध केल्यानेच त्यांची हत्या करण्यात आली. यानंतर आता सर्व आरोप आणि वाल्मिक कराड डखढ सह सीबीआयच्या ताब्यात असून नव नवे खुलासे समोर येत आहेत.

आता कराड याच्या पुण्यातील मालमत्तेचे प्रकरण उघड झाले आहे. पिंपरी चिंचवड शहरातील वाकड परिसरात असलेल्या पार्क स्ट्रीट या उच्चभ्रू सोसायटीतील वाल्मिक कराड आणि त्याची पत्नी मंजली यांच्या नावे मालमत्ता आहे. येथे ४इक्ख फ्लॅटची मिळकत असून ता आता प्रशासनाने सील केली आहे. तर ही कारवाई कर न भरल्यामुळे पिंपरी चिंचवडच्या महापालिकेच्या कर संकलन विभागाकडून करण्यात आली आहे.

दरम्यान कराडला पुण्यातील प्राइम लोकेशन असलेल्या फर्ग्युसन रस्त्यावर ऑफिस घेतल्याचा दावा देखील समोर आला आहे. पण या ठिकाणी मालमत्ता घेण्यासाठी एका महिलेनं मदत केल्याचे देखील समोर आले आहे. पण आता ही महिला कोण असा सवाल उपस्थित केला जात आहे.

पुण्यातील फर्ग्युसन रस्त्यावरील एका इमारतीचे काम सुरू असून येथे कराड याने दोन ऑफिस घेतले आहेत, असा दावा भाजपचे आमदार सुरेश धस यांनी केली होता. याबाबत त्यांनी पैठणच्या सभेत दावा केला होता. तर ही गुंतवणूक एका महिलेच्या नावावर केल्याचेहा आरोप धस यांनी केला होता. यानंतर आता खरी माहिती समोर आली असून त्या महिलेचे नाव उघड झाले आहे.वाल्मिक कराड याची गुंतवणूक आपल्या नावे करणाऱ्या महिलेचे नाव ज्योती जाधव आहे. वाल्मिक कराड याने ज्योती जाधव या महिलेच्या नावाने दोन ऑफिसेस खरेदी केली असून याचे कागदपत्रे समोर आली आहेत. ज्योती जाधव या महिलेने फर्ग्युसन रस्त्यावरील कुशल वॉल स्ट्रीट या इमारतीत काम सुरू असतानाच गुंतवणूक केली आहे. येथे ऑफिस नंबर ६१० सी अपार्टमेंट आहे. जो ४५.७१ चौ. मी कार्पेट क्षेत्र आहे. याला बाल्कनी आणि पार्किंगची जागा आहे.

तर दुसरी मालमत्ता ही ६११बी या ऑफिसचा असून तो ५४.५१चौसर मिटर आहे. यालाही बाल्कनी आणि खाली पार्किंग आहे. तर या मालमत्तेसाठी २५ कोटींची उलाढाल झाल्याचेही बोलले जात आहे. मात्र ज्योती जाधव या महिलेचा वाल्मिक कराड याच्याशी संबंध काय? याचे उत्तर अद्याप उघड झाले नसून याचा तपास ईडीकडून तपास होण्याची शक्यता आहे.

## परळीत थर्मल परिसरातील

हा शोधाचा विषय असून, साठवलेल्या राखेच्या ढिगाऱ्यांमुळे प्रदूषणाचा नाहक त्रास दादाहरी वडगावच्या ग्रामस्थांना मात्र सहन करावा लागत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून दादाहारी वडगावचे ग्रामस्थ विविध आजारांनी त्रस्त असून, दूषित पाणी पिण्याची वेळ ग्रामस्थांवर आली आहे. याशिवाय जनावरांनासुद्धा राखमिश्रित पाणी प्यावे लागत आहे. याकडे थर्मल प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप दादाहारी वडगावच्या ग्रामस्थांकडून केला जात आहे. परळी तालुक्यातील दादाहारी वडगावच्या ७५ टक्के जमिनी या दाऊतपूर राख बंधाऱ्यासाठी संपादित केलेल्या आहेत. दाऊतपूरच्या राख बंधाऱ्यातून टाकाऊ राखेचा उपसा करून त्यातील राख थर्मल परिसरातील जागेत साठविण्यात आली आहे. गेल्या दहा दिवसांपासून दाऊतपूर बंधाऱ्यातील राखेचा उपसा अनधिकृतपणे बंद करण्यात आला आहे. असे असले तरी राखेचा जुना स्टॉक वापरण्यात येत असून, त्याची वाहतूक होत आहे.

शनिवारी रात्री राखेच्या हायवाने धडक दिल्याने दुचाकीस्वार सौंदना गावचे सरपंच अभिमन्यू क्षीरसागर यांचा जागीच मृत्यू झाला आहे. याप्रकरणी परळी ग्रामीण पोलिसांनी वाहनचालकाला अटक केली आहे. थर्मल प्रशासन व पोलिस प्रशासन यांच्या दुर्लक्षामुळे बेकायदेशीर राखेची वाहतूक परळीत चालू असून, राख हायवा वाहतूक बंद झाली नसल्याचा आरोप भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी रविवारी केला होता.

प्यायला राखमिश्रित पाणी

दाऊतपूर राख बंधाऱ्यातील व साठवणूक केलेल्या बेकायदेशीर राखेच्या ढिगाऱ्यातील राखेचे कण हवेने उडून घराघरांत पसरत आहेत. त्याचा दादा वडगावच्या ग्रामस्थांना गेल्या अनेक वर्षांपासून त्रास होत असून, विविध आजार होत आहेत. हे राखेचे प्रदूषण बंद करावे, यासाठी थर्मल प्रशासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. परंतु, याकडे लक्ष दिलेले नाही. राखेच्या प्रदूषणामुळे ग्रामस्थांना दूषित पाणी प्यावे लागते, एवढेच नव्हे तर जनावरांनासुद्धा राखमिश्रित पाणी प्यायला मिळत आहे.

परळी शहरातून संभाजीनगर पोलिस ठाणे हद्दीतून बेकायदेशीर राखेच्या वाहनचालकांवर पोलिसांकडून कारवाई करण्यात आली आहे. मोटर वाहन कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत व यापुढेही गुन्हे दाखल करण्यात येतील.

वाहतूक बंद असल्याचा पोलिसांचा दावा

गेल्या आठ दिवसात परळी शहर पोलिसांनी मोटर वाहन कायद्यानुसार राख हायवा वाहनचालकांविरुद्ध गुन्हे दाखल केल्याची माहिती शहर पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी दिली. सध्या परळी शहरातून राखेची वाहतूक बंद असल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. तर दाऊतपूर राख बंधाऱ्यातून राखेचा अनधिकृत उपसा गेल्या काही दिवसापासून बंद असल्याची माहिती परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या सूत्रांकडून देण्यात आली. ही राख निविदाधारकांना देण्याची प्रक्रिया सुरू केलेली आहे. परंतु, त्यासंदर्भात आणखी निर्णय जाहीर करण्यात आलेला नसल्याचे सांगण्यात आले.

## महाराष्ट्रात २१ नवीन

असल्याचे दिसते.

प्रस्तावित नवीन जिल्ह्यांमध्ये जळगावमधील भुसावळ, लातूरमधील उदगीर, बीडमधील अंबेजोगाई, नाशिकमधील मालेगाव आणि कळवण, नांदेडमधील किनवट, ठाण्यातील मीरा-भाईंदर आणि कल्याण, सांगली, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांच्या काही भागांतून मिळून माणदेश, बुलढाण्यातील खामगाव, पुण्यातील बारामती, पालघरमधील जव्हार, अमरावतीमधील अचलपूर, भंडाऱ्यातील साकोली, रत्नागिरीतील मंडणगड, रायगडमधील महाड, अहमदनगरमधील शिर्डी, श्रीरामपूर आणि संगमनेर, गडचिरोलीतील अहेरी आणि यवतमाळमधील पुसद या जिल्ह्यांचा समावेश आहे.

या नवीन जिल्ह्यांच्या निर्मितीमुळे प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ होईल आणि स्थानिक पातळीवर विकासकामांना चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, या निर्णयाची अंमलबजावणी करताना आव्हानेही असू शकतात, ज्यांचा विचार करणे आवश्यक आहे. नवीन जिल्ह्यांच्या निर्मितीमुळे पायाभूत सुविधा, प्रशासकीय यंत्रणा आणि इतर बाबींवर होणारा परिणाम याबाबत सखोल अभ्यास होणे गरजेचे आहे.

नवीन जिल्ह्यांची घोषणा केव्हा होणार?

अद्याप या प्रस्तावाला अधिकृत मान्यता मिळालेली नसली तरी, येत्या प्रजासत्ताकदिनी या संदर्भात घोषणा होण्याची दाट शक्यता आहे. या घोषणेकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.